नि.दि.दावा क्र. ८३६/२०१४ निशाणी क्र. ५६ खाली

**<u>प्रतिवादी क्र. १ चा सरतपास प्रतिवादी तर्फे वकील श्री. एस.एस.सुर्यवंशी यांचे मार्फत –</u>**

शपथपत्रातील मजकूर माझे सांगणेप्रमाणे लिहीण्यात आला असून तो बरोबर आहे. शपथपत्रावर वाचून मी सही केली आहे.

**<u>वादी तसेच प्रतिदाव्यातील इतर प्रतिवादी व त्यांचे वकील वारंवार पुकारा केला असता गैरहजर. सबब उलटतपास पुढील तारखेपर्यंत न्यायास्तव तहकुब.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-
( दिलीप गं. जगताप )

दिनांक–२२.०७.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, परंडा

**प्रतिवादी क्र. १ व प्रतिदाव्यातील वादी यांचे वकीलांनी दस्तास निशाणी दयायची राहुन गेली असल्यामुळे पुन्हा सरतपासाची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

(अर्ज निशाणी क्र. ६१ सोबत असलेल्या दस्तऐवज यादी निशाणी क्र. ६४ देण्यात आली.) निशाणी क्र. ६४ सोबत असलेला दस्तऐवज क्र. १ नोंदणीकृत खरेदीखताची नोंदणी क्र. ९४९/१९९५ दिनांक २६.०६.१९९५ ची प्रत दाखविण्यात आली. ते मी तसेच प्रकरणातील वादी आजिनाथ निवृत्ती भोळे व गोरख निवृत्ती गपाट यांना करुन दिलेले आहे. ते चिंचपुर येथील गट क्र. ३५९ पैकी वादी ईश्वरचे पूर्ण हिस्याचे क्षेत्राचे त्याचे मुलीचे लग्नासाठी शेताचे खरेदीखत आहे. त्यावर

माझा अंगठा आहे. तसेच वादी ईश्वरची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ६५** देण्यात आली.

**उलटतपास मुळ दाव्यातील व प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. २ व प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ८ तर्फे श्री. बी.व्ही.औसरे यांचे मार्फत –**

मला लिहिता वाचता येत नाही. मी गुजरात येथे कोणत्या वर्षी गेलो होते हे मी सांगु शकत नाही. मी ३५ ते ४० वर्षापूर्वी गेलो होतो. आम्ही काशिनाथ, शेषनाथ, ईश्वर, राजाराम, सोजरबाई व साखरबाई असे भाऊ बहिण आहोत. शेषनाथ हा थोरला भाऊ आहे. सर्वात धाकटा ईश्वर आहे. मुळ दाव्यातील वादीने त्याच्या हिस्याची जमीन विकली तेव्हा ७/१२ माझे नावाने होता. जमीन विक्री करतेवेळेस आमच्यात वाटपपत्र झाले नव्हते. ईश्वरने त्याचे हिस्याची जमीन विकली. त्यावेळेस आमचे तोंडी वाटप झाले होते.

माझे वडीलांना टी.बी. झाला होता. माझे वडील कोणत्या वर्षी आजारी झाले ते मी सांगु शकत नाही. उपचारासाठी एक लाखापेक्षा खर्च झाला होता. माझे वडील दिनांक १६.०६.१९८७ रोजी मरण पावले. माझे वडील आजारी असताना मी गावातच होतो. वडील मयत झाल्यानंतर १० ते १५ वर्षानंतर मी गुजरात येथे गेलो. माझे वडील मरण पावले तेव्हा माझे वय १३ ते १४ वर्षे होते. बहिणींचे लग्न झाले तेव्हा मी लहान होतो. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा मला काही कळत नव्हते. एकत्र कुटुंब कर्ता म्हणुन तिन्ही गटाला माझे नाव लागले होते.

गट क्र. ३३१ मधील माझे हिस्याला आलेली २४ आर व गट क्र. ३५९ मधील ३६ आर जमीन मी स्वतंत्ररित्या विकली. मी त्या जमीन एकाच दिवशी आई वडीलांचे कर्ज फेडण्यासाठी विकल्या. मी प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ८ विरुध्द गट क्र. ४२९ मधील चिंचेच्या झाडाच्या चिंचा चोरीची तक्रार केली होती. त्या प्रकरणातुन आरोपीची निर्दोष सुटका झाली होती. ईश्वरच्या मुलीचे लग्न कोणत्या वर्षी

झाले हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ३३१ मधील २६ आर तसेच गट क्र. ३५९ मधील ७६ आर माझ्या हिस्याला आलेली जमीन मी विकलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे राहिलेल्या जमीनीश माझा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज मी खोटी साक्ष देत आहे.

वादी तसेच उर्वरीत प्रतिवादी व त्यांचे विधीज्ञ गैरहजर. सबब उलटतपास त्यांचे तर्फे बंद करण्यात आला.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2025.12.03 17:01:04 +0530

( दिलीप गं. जगताप )

दिनांक–०३.१२.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, परंडा